## आदेश निशाणी क्र. ४०

( पारीत दिनांक २८ माहे एप्रिल २०२६ )

०१. प्रतिवादीं क्र. ३ ते ८ यांनी सदरच्या अर्जाद्वारे वादी यांच्या शेतजमिनीमध्ये बांध आहे किंवा नाही, याची पाहणी करण्यासाठी आणि त्याची लांबी, रुंदी किती, त्यांना वादींच्या बांधावरून रस्ता आहे, किंवा नाही, हे न्यायालयासमक्ष आणण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता (यापुढे सोयीसाठी **'संहिता'** असा उल्लेख केला जाईल) च्या आदेश ३९ नियम ७ अन्वये न्यायालयीन आयुक्त नियुक्त करावा आणि त्यांच्यामार्फत अहवाल मागवावा, अशी मागणी केलेली आहे.

०२. सदर प्रतिवादींनुसार, वादींनी सदरचा दावा हा उपविभागीय अधिकारी यांनी अधिकारी, भूम यांनी त्यांच्या हक्कात दिलेल्या निकालाला रद्द करावे म्हणून दावा दाखल केलेला आहे, ज्यात त्या निकालाच्या अंमलबजावणीस स्थगिती मिळावी म्हणून तात्पुरत्या मनाई हुकुमाचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यांनी सदर अर्जाला म्हणणे आणि लेखी कैफियत सादर केलेली असून त्यासोबत नजरी नकाशाही दिलेला आहे, ज्यामध्ये लाल रंगाने दर्शविलेला रस्ता विवादीत आहे. त्यांच्यानुसार, वादी कथन करीत आहेत की, त्यांच्या गट क्र. ४५१ आणि ४२४ च्यामध्ये बांध नाही. वादीने दाव्यासोबतच्या परिशिष्टामध्ये जो नजरी नकाशा दिलेला आहे, ज्यामध्ये उत्तर बाजुला सर्व्हे क्र. ४६३ मध्ये मधोमध कॅनॉल रस्ता दाखविलेला आहे, जो की तेथे नाही. जो वारेवडगाव ते भूम रस्ता दाखविलेला आहे, तो त्यांच्या शेजमिनीपासून सुमारे पाउनेदोन किमी अंतरावर आहे आणि त्या दरम्यान ३० ते ४० खातेदारांच्या शेती आहेत. सदर परिशिष्टातील नकाशात पश्चिम बाजुला त्यांच्या क्षेत्राला

लागून कॅनॉल रस्ता नाही, तर त्या दरम्यान १० ते १५ खातेदारांच्या शेतजमिनी आहेत. त्यांनी पुढे असेही कथन केलेले आहे की, वादीनुसार, त्यांच्या शेतजमिनीपर्यंत त्यांनी रस्ता तयार केलेला नाही, रस्ता अस्तित्वात नाही, तो त्यांच्या बांधावरून जात नाही, तेव्हा या सर्व बाबींची पाहणी करणे, वादींच्या बांधाची लांबी—रुंदी मोजणे, त्यांनी केलेल्या रस्त्याची पाहणी करणे आणि आहे ती स्थिती न्यायालयासमक्ष अहवालाद्वारे आणण्यासाठी सक्षम अधिकारी, किंवा शासकीय अधिकारी यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती करणे गरजेचे आहे. ते त्यासाठीचा खर्च करण्यास तयार आहे, तेव्हा त्यांनी अर्ज मागणीप्रमाणे मंजूर करावा, अशी विनंती केलेली आहे.

०३.   वादींनी सदरच्या अर्जाला म्हणणे देवून प्रकरणात तात्पुरत्या मनाई हुकुमाच्या अर्जावर, निशाणी क्र. ५ वर, युक्तीवाद झाल्यानंतर, सदरचा अर्ज दिल्या गेलेला आहे; परंतु त्यात नमुद केलेली कारणे स्वीकारता येण्याजोगी नाहीत. त्यांच्यानुसार, सदरचा अर्ज हा सदर प्रतिवादींनी केवळ पुरावा गोळा करण्यासाठी दिल्या गेलेला आहे. त्यांचा दावा हा उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशाची वैधता तपासण्यासाठी दिल्या गेलेला आहे, ज्यात मंडळ निरीक्षक यांनी अगोदरच स्थळ पाहणी केलेली आहे, जो दस्त दाखल आहे, तेव्हा सदरचा अर्ज त्यांनी नामंजूर करावा, अशी विनंती केलेली आहे.

०४.   सदर प्रतिवादींसाठी वकील श्री. व्ही. डी. पवार यांना ऐकले तर वादींसाठी वकील श्री. आर. व्ही. मोटे यांना ऐकले.

०५.   संहितेच्या आदेश ३९ नियम ७(१)(अ) मधील तरतुदीचे अवलोकन केले असता न्यायालयास स्वेच्छाधिकार दिलेला आहे की,

दाव्याच्या कोणत्याही पक्षाच्या अर्जावरून आणि त्यास योग्य वाटतील अशा अटीवर एखाद्या मिळकतीची, जी विवादाचा विषयवस्तू आहे, किंवा ज्याबाबत दाव्यात कोणता प्रश्न निर्माण झालेला आहे, तिची तपासणी करण्याचा आदेश करू शकते. सदर तरतुदीतहतच्या तपासणीचा उद्देश हा केवळ ती मिळकत ही आहे त्या स्थितीत राहावी, या उद्देशाने तिची त्यावेळच्या स्थितीची तपासणी करणे ऐवढाच आहे. सदर प्रकरणात वादींनी दावा केलेला आहे की, उपविभागीय अधिकारी यांनी त्यांच्या शेजमिनीतून सदर प्रतिवादींना रस्ता नसताना तो तसा आहे, असा आदेश देवून तो खुला करून द्यावा, अशा त्यांना आदेश दिलेला आहे, त्याला आव्हान दिलेले आहे, तर सदर प्रतिवादींनुसार, वादींच्या दरम्यानच्या बांधावरून त्यांनी रस्ता तयार करण्यास संमती दिली होती म्हणून त्यांनी वादींच्या शेतीपर्यंत रस्ता तयार करीत आणला आहे आणि आता वादीं तसा रस्ता तयार करू देत नाहीत, तेव्हा येथे कोणत्याही विवादाच्या विषयवस्तुची यथास्थिती ठेवण्याचा प्रश्न नाही, तेव्हा सदर प्रतिवादींनी सदरची तरतूदीचा घेतलेला आधार हा चुकीचा आहे. त्यांच्या अर्जाचा विचार केला असता ते स्थळ पाहणीसाठी आयुक्त नियुक्तीची मागणी करीत आहेत, ज्या सबंधाने संहितेच्या आदेश २६ नियम ९ मध्ये तरतूद आहे की, एखाद्या दाव्यामध्ये न्यायालयास वाटले तर स्थळ पाहणीसाठी न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती केली जाईल, जर का विवादाची विषयवस्तू स्पष्ट होण्यासाठी आवश्यक आणि उचित असेल तर आणि अशा न्यायालयीन आयुक्ताद्वारे तपास करून त्यास त्याबाबत अहवाल दाखल करण्याचा निर्देश देईल. कायद्याची ही स्थिती सुस्थापीत आहे की, अशा न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती ही कोणत्या पक्षकाराच्या समर्थनार्थ पुरावा गोळा करण्यासाठी नसते.

०६. उपरोक्त पार्श्वभूमीवर हातातील प्रकरणाचा विचार केला असता श्री. पवार, सदर प्रतिवादींचे वकील, यांनी असा युक्तीवाद केला की, वादींनी त्यांच्या दाव्यासोबतच्या परिशिष्टामध्ये दिलेल्या नजरी नकाशात सदर प्रतिवादींच्या पश्चिम, उत्तर आणि पूर्व बाजुने कॅनॉल आणि सिंमेट रस्ते दाखविलेले आहेत, जेव्हा की, ते तसे अस्तीत्वात नाहीत, तर त्यांच्यानुसार, वादींच्या संमतीनेच सदर प्रतिवादींनी त्यांच्या शेजमिनीपर्यंत रस्ता तयार करीत आणलेला आहे आणि आता वादीं त्यांच्या बांधावरून रस्ता तयार करू देण्यास तयार नाहीत. त्यांच्यानुसार, सदर प्रतिवादींना वादींच्या बांधाशिवाय ईतरत्र कोठुनही रस्ता नाही, म्हणूनच तर उपविभागीय अधिकारी, भूम यांनी त्या बांधावरून रस्ता खुला करून द्यावा, म्हणून आदेश दिलेला आहे, तेव्हा त्यांच्यानुसार, सदर ठिकाणची यथास्थितीची पाहणी करून ती स्थिती न्यायालयासमक्ष आणण्यासाठी न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती करणे गरजेचे आहे, तेव्हा अर्ज मंजूर करावा, अशी त्यांनी विनंती केली. उलटपक्षी श्री. मोटे, वादींचे वकील, यांनी निवेदन केले की, सदरचा अर्ज हा सदर प्रतिवादीं यांनी तात्पुरत्या मनाई हुकुमाच्या अर्जावरील युक्तीवाद पूर्ण झाल्यानंतर दिलेला आहे, जेव्हा की, त्यात केलेले निवेदन हे स्वीकारण्यायोग्य नाही. त्यांच्यानुसार, सदर प्रतिवादींनी हा अर्ज केवळ पुरावा गोळा करण्याच्या उद्‌देशाने दिलेला आहे; परंतु त्यास परवानगी दिली जावू शकत नाही. त्यांच्यानुसार, दोन्ही पक्षांनी आवश्यक तो कागदोपत्री पुरावा सादर केलेला आहे, तेव्हा न्यायालयीन आयुक्त नियुक्तीची या टप्प्यावर कोणतीही आवश्यकता नाही. शिवाय त्यांच्यानुसार, प्रतिवादी क्र. ८ ची वादी क्र. २ लगत पूर्व बाजुला सर्व्हे क्र. ४२४ मध्ये शेतजमीन असून त्यातून तो उर्वरीत प्रतिवादींसह रस्ता तयार न करता वादींच्या शेतजमिनीतून रस्त्याची मागणी करीत आहे, जे की, समसमानतेच्या

तत्वातहत नाही, म्हणून त्यांनी अर्ज नामंजूर करावा, अशी विनंती केलेली आहे.

०७. उपरोक्त कायदेशीर स्थिती आणि दोन्ही पक्षाच्या वकिलांचा युक्तीवाद याच्या पार्श्र्वभूमीवर सदर प्रतिवादींच्या अर्जाचा विचार केला असता हे नाकारण्याचे कारण नाही की, कायद्याची ही स्थिती सुस्थापीत आहे की, कोणत्याही पक्षकाराच्या समर्थनार्थ पुरावा गोळा करण्यासाठी न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती करता येत नाही; परंतु जर का अशा न्यायालयीन नियुक्तीमुळे काही विषयवस्तू या केवळ जायमोक्यावर (on the spot) असतील आणि त्या प्रयत्न करुनही पक्षकार स्वत: त्या न्यायालयासमक्ष आणण्यात सक्षम ठरत नसतील तर न्यायालयाने आपला स्वेच्छाधिकार वापरून ते न्यायालयासमक्ष आणण्यासाठी न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती करणे योग्य ठरते. अशी खरेच गरज सदर प्रकरणात आहे का, याचा विचार केला असता श्री. पवार यांनी दोन्ही वादीं आणि सदर प्रतिवादींच्या लेखी कैफियतसोबत दाखल नजरी नकाशाकडे लक्ष्य वेधून जे निवेदन केले, ते पाहिले असता असे दिसते की, दोन्ही पक्षांनी अगदी विरुद्ध असणारे नजरी नकाशा वादकथनकासोबत जोडलेले आहेत, ज्यावरून दोघांचीही बाजू स्पष्ट होत नाही. वादी म्हणतात की, सदर प्रतिवादींना त्यांच्या ना केवळ पश्चिम बाजुने रस्ता उपलब्ध आहे, तर उत्तर बाजू आणि पूर्व बाजुलाही जवळचे रस्ते उपलब्ध आहेत; परंतु सदर प्रतिवादींनुसार, तसे रस्ते उपलब्ध असल्याचे वादींचे कथन हे चुकीचे आहे, त्यामुळेच उपविभागीय अधिकारी, भूम यांनी त्यांचा रस्ता मागणीचा अर्ज मंजूर करून त्यांना रस्ता मंजूर केलेला आहे. या स्थितीत हे सुस्पष्ट आहे की, दोन्ही पक्षकारांचे कथनक हे सदर न्यायालयास कोणताही निर्णय घेण्यास

सद्य:स्थितीत सहाय्य करणारे आहे, असे म्हणता येणार नाही. तेव्हा हे स्पष्ट होते की, जी काही स्थिती जायमोक्यावर आहे, ती न्यायालयासमक्ष येणे आवश्यक आहे, कारण सदर न्यायालयास वादींचा तात्पुरत्या मनाई हुकुमाचा अर्ज देखील निर्णयीत करावयाचा आहे, जो जायमोक्यावरील यथास्थिती काय आहे, हे उघड झाल्याशिवाय करता येणार नाही.

०८. उपरोक्त परिस्थितीत न्यायालयासमोर केवळ एकच पर्याय आहे तो सदर प्रकरणात न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती करून जायमोक्यावरील यथास्थिती समोर आणावी, जेणेकरून वादींचा तात्पुरत्या मनाई हुकुमाचा अर्जही योग्य तथ्यांवरून निर्णयीत करता येईल. राहिला प्रश्न वादींच्या अक्षेपांचा तर केवळ तात्पुरत्या मनाई हुकुमाच्या अर्जाचा युक्तीवाद झाल्यानंतर सदरचा अर्ज आल्यामुळे तो दखलपात्र ठरणार नाही, असे म्हणता येणार नाही. शिवाय असेही म्हणता येणार नाही की, न्यायालयीन आयुक्तांच्या माध्यमातून सदर प्रतिवादीं हे पुरावा गोळा करतील. त्याबाबत योग्य ती खबरदारी आयुक्त घेतील याची काळजी घेणे निश्चितच आवश्यक आहे. हे ही नाकारण्याचे कारण नाही की, दोन्ही पक्षांनी कागदोपत्री पुरावा सादर केलेला आहे; मात्र तो जायमोक्यावरील स्थिती स्पष्ट करण्यासाठी पुरेसा आहे, असे म्हणता येणार नाही. वादीं कथन करताहेत त्याप्रमाणे की, सदर प्रतिवादीं कथन करताहेत त्याप्रमाणे तेथे रस्ते उपलब्ध आहेत, हे कागदपत्र स्पष्ट करण्यास सक्षम नाहीत. ते फक्त जायमोक्यावर स्थळ पाहणी करूनच साध्य होवू शकते, अन्यथा रस्त्याच्या स्थितीच्या बाबी पुढे येणे संभव नाही. तेव्हा न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती करण्यासाठी स्वेच्छाधिकार वापरण्यास सदर प्रकरण हे योग्य प्रकरण आहे, हे निश्चित म्हणून

अर्ज मंजूर करण्यायोग्य असल्याने पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे:

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे;

२. वादीं आणि सदर प्रतिवादीं यांनी त्यांच्या—त्यांच्या वादकथनकाच्या समर्थनार्थ दिलेल्या नजरी नकाशानुषंगाने जायमोक्यावर जावून स्थळपाहणी करून तेथील यथास्थिती अहवालाद्वारे न्यायालयासमक्ष आणण्यासाठी दोन्ही पक्षास मान्य असेल अशा वकिलाची न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे;

३. पुढील आदेश हा दोन्ही पक्षांनी न्यायालयीन आयुक्त म्हणून वकिलाचे नाव सुचविल्यावरून पारीत करण्यात येईल;

४. परिव्यय हा अर्जदार/सदर प्रतिवादींवर राहील.

BHAGWAN DHONDIRAM PANDIT
Digitally signed by BHAGWAN DHONDIRAM PANDIT
Date: 2026.04.28 17:46:54 +0530

दिनांक: २८.०४.२०२६

**(भगवान धों. पंडित)**
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
भूम, जि. उस्मानाबाद.

CERTIFICATE

I affirm that the contents of this P D F file order/ judgment are same word to word as per the original order/judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | D. G. Waghmare (Grade-III) |
| Name of Court | : | Civil Court Senior Division<br>Bhoom Tq. Bhoom<br>Dist.Osmanabad. |
| Order/ Judgment date | : | 28.04.2026 |
| Order/ Judgment signed by the Presiding Officer on | : | 28.04.2026 |
| Order/ Judgment uploaded on | : | 28.04.2026 |